"Education through Self-Help is our Motto"

Rayat Shikshan Sanstha's,



# Chandraroop Dakle Jain College of Commerce,

Shrirampur- 413709, Dist. Ahmednagar. (M.S.) ESTB-1962

Academic Year 2022-23

## CRITERION – II : TEACHING, LEARNING AND EVALUATION

### Key Indicator: Student Enrollment and Profile (QnM)

| Question Metric No. | |
|---|---|
| 2.1.2 | Average percentage of seats filled against seats reserved for various categories as perapplicable reservation policy (QnM) |
| **Response :** | **97.21 %** |

Chandraroop Dakle Jain College of Commerce Shrirampur

## QnM2.1.2

**Number of seats filled against seats reserved for various categories (SC,ST, OBC, Divyangjan, etc. as per applicable reservation policy during the year (exclusive of supernumerary seats)**

2.1.2.1. Number of actual students admitted from the reservedcategories during theyear

Table No – 3 Showing Categoriwise Distribution of Students

| Year | [A] Sanctioned | | | | | | [B] Admitted | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2022-23 | SC | ST | NT | OBC | Other (Open) | Total | SC | ST | NT | OBC | Other (Open) | Total |
| Total | 248 | 136 | 216 | 368 | 1020 | 1988 | 226 | 45 | 198 | 472 | 876 | 1817 |
| % as per formula | 13% | 07% | 11% | 19% | 50% | 100% | 91.12% | 33.08 % | 91.67% | 128.26 % | 85.88 % | 91.40% |
| Marks | | | | | | | 1.5 | 1.5 | 1.5 | 4.0 | 1.5 | 10.00 |

Formula :-

$$\text{Percentage Per Year} = \frac{\text{Actual Number of Students admitted from reserved categories}}{\text{Number of Seats earmarked for reserved category as per GOI or State Government Rule}} * 100$$

| | | | | Marks |
|---|---|---|---|---|
| i) | SC % | $= \frac{226}{248} * 100$ | = 91.12 % | 1.5 |
| ii) | ST % | $= \frac{45}{136} * 100$ | = 33.08 % | 1.5 |
| iii) | NT % | $= \frac{198}{216} * 100$ | = 91.67 % | 1.5 |
| iv) | OBC % | $= \frac{472}{368} * 100$ | = 128.26 % | 4.0 |
| v) | Open Other % | $= \frac{876}{1020} * 100$ | = 85.88 % | 1.5 |
| | | | | 10.00 |

Rayat Shikshan Sanstha's,

C. D. Jain College of Commerce, Shrirampur

Year 2022-23

## Government Reservation Policy as per Caste & Category for Admissions

**Grantable Division Wise Seats Allocation ChartB. Com, M. Com & BBA (CA)**

| Sr. No | Caste Category | % Allotted | B.Com (240) | BBA (CA) (80) | M.Com (60) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | SC (अनुसूचित जाती) | 13% | 31 | 10 | 08 |
| 2 | ST (अनुसूचित जमाती) | 07% | 17 | 06 | 04 |
| 3 | NT A (विमुक्त जमाती अ) | 03% | 07 | 02 | 02 |
| 4 | NT B (विमुक्त जमाती ब) | 2.5% | 06 | 02 | 02 |
| 5 | NT C (भटक्या जमाती सी) | 3.5% | 08 | 03 | 02 |
| 6 | NT D (भटक्या जमाती डी) | 02% | 05 | 02 | 01 |
| 7 | OBC (इतर मागासवर्ग) | 19% | 46 | 15 | 11 |
| 8 | Handicapped (अपंग सर्व प्रवर्गासह) | 03% | 07 | 02 | 02 |
| 9 | SBC (एस बी सी विशेष मागासवर्ग) | 02% | 05 | 02 | 01 |
| 10 | EWS (विशेष आर्थिकदृष्ट्यामागास) | 10% | 24 | 08 | 06 |
| 11 | Orphan (अनाथ) | 01% | 02 | 01 | 01 |
| 12 | Open to All (खुला प्रवर्ग) | 34% | 82 | 27 | 20 |
| * | **Total** | **100%** | **240** | **80** | **60** |

I/C Principal
C.D.Jain College of Commerce
Shrirampur, Dist.Ahmednagar

Chandraroop Dakle Jain College of Commerce
Shrirampur

# CASTE CATEGORY WISESANCTIONED SEAT CHART 2022-23

| S.N. | Caste | | B. Com | M.Com | BBA(CA) | | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **SANCTIONED SEATS** | | | | | | |
| 1 | SC | | 186 | 31 | 31 | | 248 |
| 2 | ST | | 102 | 17 | 17 | | 136 |
| 3 | NT A | | 42 | 07 | 07 | | 56 |
| 4 | NT B | | 36 | 06 | 06 | | 48 |
| 5 | NT C | | 54 | 09 | 09 | | 72 |
| 6 | NT D | | 30 | 05 | 05 | | 40 |
| 7 | OBC | | 276 | 46 | 46 | | 368 |
| 8 | HANDICAPPED | | 42 | 07 | 07 | | 56 |
| 9 | SBC | | 24 | 04 | 04 | | 32 |
| 10 | OPEN | | 648 | 108 | 108 | | 864 |
| **SANCTIONED SEATS WITHOUT EXTENSION** | | | **1440** | **240** | **240** | | **1920** |
| | **10% EXTENSION** | **FY** | 48 | 12 | 08 | | **68** |
| **TOTAL SANCTIONED SEATS WITH EXTENSION** | | | | | | | **1988** |

I/C Principal
C.D.Jain College of Commerce
Shrirampur, Dist.Ahmednagar

## Academic Year 2022-23

### CATEGORY WISE ADMITTED SEATS

| S.N. | | | B.COM | BBA(CA) | M. COM | Total |
|---|---|---|---|---|---|---|
| | **ADMITTED SEATS (2022-23)** | | | | | |
| 1 | SC | | 159 | 37 | 30 | 226 |
| 2 | ST | | 32 | 04 | 09 | 45 |
| 3 | NT | | 146 | 23 | 29 | 198 |
| 4 | OBC | | 325 | 72 | 75 | 472 |
| 5 | OPEN | | 664 | 113 | 99 | 876 |
| | | | | | | |
| | **TOTAL ADMITTED SEATS WITH EXTENSION** | | **1326** | **249** | **242** | **1817** |

I/C Principal
C.D.Jain College of Commerce
Shrirampur, Dist.Ahmednagar

26

Chandraroop Dakle Jain College of Commerce, Shrirampur

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. २२८/२०२०**

**शैक्षणिक प्रवेशामध्ये पाळावयाच्या आरक्षणाबाबत...**

या परिपत्रकाव्दारे सर्व संबंधिताना कळविण्यात येते की, शैक्षणिक प्रवेशामध्ये पाळावयाच्या आरक्षणा सदर्भात शासनाने वेळोवेळी शासन आदेश निर्गमित केलेले आहेत. विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था येथील शैक्षणिक प्रवेशामध्ये आरक्षण धोरणाची अंबलबजावणी करण्याबाबत वेळोवेळी सर्व संबंधिताना सूचना देण्यात आलेल्या आहेत. सोबत विद्यापीठ परिपत्रक दि. २७/०६/२०११ व परिपत्रक दि. ३०/०८/२०१९ च्या प्रती सोबत जोडत आहे.

शैक्षणिक वर्ष २०२०–२१ साठी विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था येथे प्रवेश प्रक्रिया सुरू असून अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी आरक्षणा संदर्भात केलेल्या तरतुदीनुसार व त्या त्या प्रर्वगासाठी विहित केलेल्या आरक्षणाच्या टक्केवारी नुसार प्रवेशाबाबतची कार्यवाही करणे बंधनकारक आहे. तरी शैक्षणिक प्रवेशामध्ये पाळावयाच्या आरक्षणा संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन आदेशाची काटेकोरपणे अंबलबजावणी व्हावी

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ : शै प्रवेश/१२३४
दिनांक : ०८/०८/२०२०

(signature) ०८/०८/२०२०
उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :—

मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
मा. प्राचार्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये
मा. संचालक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मान्यताप्राप्त सर्व परिसंस्था

Chandraroop Dakle Jain College of Commerce, Shrirampur

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

परिपत्रक

**विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांमध्ये प्रवेशाकरीता मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गास जागा आरक्षित ठेवण्याबाबत.**

या परिपत्रकाव्दारे सर्व संबधिताना कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठातील शैक्षणिक संस्थामध्ये विविध अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) वर्गास जागा आरक्षित ठेवण्याबाबत शासनाने शासन परिपत्रक क्र. संकीर्ण—२०१९/प्र.क्र.२२/विशि—३ दि.०९ जुलै, २०१९ अन्वये आदेश दिलेले आहेत. सोबत शासन निर्णय व पत्राची प्रत जोडत आहे. तरी सदर शासन निर्णयातील तरतुदींची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७. )
संदर्भ क्र. शै.प्रवेश/३०१६ )
दिनांक : ३०/०८/२०१९ )

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

प्रत:

मा. प्राचार्य/संचालक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय/संस्था.

महाराष्ट्र राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाकरिता मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गास जागा आरक्षित ठेवण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र. २२/विशि-३
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ०९ जुलै, २०१९.

संदर्भ :-

१. विधी व न्याय विभागाचा सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६२, दि. ३० नोव्हेंबर, २०१८.

२. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि. १२ फेब्रुवारी, २०१९.

३. विभागाचे समक्रमांकाचे दि. ०८ मार्च, २०१९ रोजीचे शासन परिपत्रक.

४. विधी व न्याय विभागाचा सन २०१९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, दि. ३ जुलै, २०१९.

प्रस्तावना:-

महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) नागरिकांच्या वर्गांच्या प्रगतीसाठी राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरिता जागांच्या आरक्षणासाठी आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांच्या आणि पदांच्या आरक्षणासाठी आणि तत्संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींची तरतुद करण्यासाठीचा अधिनियम उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या दि. ३० नोव्हेंबर, २०१८ च्या राजपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर अधिनियमातील मुद्दा क्र. ४ (१)(क), अन्वये राज्यातील अनुदानित तसेच विनाअनुदानित शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाच्या एकूण १६% जागा मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) नागरिकांच्या प्रवर्गासाठी आरक्षित करण्यात आल्या आहेत. तसेच संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी शासकीय सेवा व शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाकरिता १०% जागा आरक्षित करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र. ४ अन्वये शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाबाबतचे आवश्यक आदेश सर्व संबंधीत विभागांनी तात्काळ निर्गमित करण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे. त्यास अनुसरुन राज्यातील अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांखेरीज सर्व सार्वजनिक अकृषी विद्यापीठातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाकरिता मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गास १६ % जागा तसेच खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी १०% जागा आरक्षित ठेवण्याबाबत विभागाने संदर्भ क्र. ३ येथील दि. ०८ मार्च, २०१९ रोजी शासन परिपत्रक निर्गमित केले आहे.

तथापि, महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गांकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरिता जागांचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे आणि पदांचे) आरक्षण अधिनियम, २०१८ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम उपरोक्त संदर्भ क्र. ४ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या दि. ३ जुलै, २०१९ च्या राजपत्रान्वये प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर अधिनियमातील मुद्दा क्र. २(क), अन्वये राज्यातील अनुदानित तसेच विनाअनुदानित शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाच्या एकूण १६ % च्याऐवजी १२% जागा मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) नागरिकांच्या प्रवर्गासाठी आरक्षित करण्यात आल्या आहेत. त्यास अनुसरुन सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) नागरिकांच्या वर्गांस १२% जागा महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाकरिता आरक्षित करण्याबाबत या विभागाच्या अधिनस्त असलेल्या सर्व अकृषी विद्यापीठांना निर्देश देण्याकरिता याबाबतचे शासन परिपत्रक निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक:-**

उपरोक्त संदर्भ क्र. ४ ला अनुसरुन महाराष्ट्र राज्यातील सर्व सार्वजनिक अकृषी विद्यापीठातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाकरिता मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गांस १६% च्या ऐवजी १२% जागा आरक्षित ठेवण्यात याव्यात.

२. संदर्भ क्र ३ येथील शासन परिपत्रकान्वये सूचित केल्याप्रमाणे खुल्या प्रवर्गातील आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांसाठी १०% आरक्षित जागा कायम राहतील.

३. शासनाने निर्धारित केलेले शैक्षणिक संस्थातील प्रवेशामधील सदर आरक्षण राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण विभागातंर्गत येणाऱ्या अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थाखेरीज सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, विधी विद्यापीठे, स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे, त्यांच्याशी संलग्नीत असणारी सर्व अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालये व स्वायत्त महाविद्यालये यांना लागू होईल. सदर आदेशाची प्रभावी अंमलबजावणी होईल हे पाहण्याची जबाबदारी संबंधित विद्यापीठाची राहील.

४. शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशासाठी विद्यापीठांनी/संस्थांनी नियम / परिनियम तयार केले असतील आणि त्यामध्ये विविध सामाजिक घटकांचे आरक्षण तरतुदीनुसार आले असेल तर या आरक्षणाच्या अनुषंगाने त्या नियमात/ परिनियमात संबंधितांनी विहित कार्यपध्दतीनुसार आवश्यक त्या सुधारणा तातडीने कराव्यात.

५. सर्व विद्यापीठांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदरचे परिपत्रक त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व शैक्षणिक संस्थांच्या निदर्शनास आणून द्यावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०७०९१२३५०९६१०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SIDDHARTH KHARAT

(सिध्दार्थ खरात)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे विशेष कार्यअधिकारी, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
६. सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलगुरु / कुलसचिव.
७. सर्व विधि विद्यापीठांचे कुलगुरू/ कुलसचिव.
८. सर्व स्वंय अर्थसहाय्यीत / अभिमत विद्यापीठांचे कुलगुरू/ कुलसचिव
९. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य.
१२. सर्व विभागीय सहसंचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
१३. सह सचिव, (विशि), उप सचिव, (मशि) (तांशि), उच्च व तंत्र शिक्षण विभाग याचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१४. उप सचिव (१६अ), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
१५.निवड नस्ती - कार्यासन विशि-३.

31

# महाराष्ट्र शासन

## शिक्षण संचालनालय (उच्चशिक्षण)

महाराष्ट्र राज्य , मध्यवर्ती इमारत, पहिला मजला,पुणे-४११००१.
www.dhepune.gov.in Email.vishi.dhepune@nic.in

क्र-उशिसं/संकीर्ण/एसईबीएस-आरक्षण /वि.शि./२०१९/ 10979 दि.२२.०८.२०१९

23 AUG 2019

प्रति,

१) मा.कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे

२) विभागीय सहसंचालक,
उच्चशिक्षण, सर्व विभाग.

मा. कुलसचिव यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
आवक /क्र.आर/ 5230
दिनांक - 24/8/19
विभाग - 26/8/19
(PG)

विषय- महाराष्ट्र राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाकरिता मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी ) वर्गास जागा आरक्षित ठेवण्याबाबत.

संदर्भ-१.शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र-संकीर्ण-२०१९//प्र.क्र.२२/विशि-३ दिनांक- ०९ जुलै, २०१९

वरील विषयानुसार सर्व विद्यापीठांना तसेच सर्व विभागीय सहसचांलक, उच्चशिक्षण, सर्व विभाग यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाकरिता मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी ) वर्गास जागा आरक्षित ठेवण्याबाबत चा निर्णय शासनाने संदर्भिय निर्णयान्वये घेतला आहे.

जरी सदर शासन निर्णयात देण्यात आलेल्या निर्देशाप्रमाणे मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिदृष्टया मागास वर्गाकरिता १२ % जागा प्रवेशासाठी आरक्षित ठेवण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी, ही विंनती. सुलभ संदर्भाकरीता सोबत शासन निर्णयाची प्रत जोडली आहे.

( सुयश दुसाने )
प्रशासन अधिकारी
शिक्षण संचालनालय (उच्चशिक्षण)
महाराष्ट्र राज्य,पुणे-१

उप. कु. (P.G.)

23.8

मा.सचिव,उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई यांना माहितीस्तव सादर

Rahul file

32

# पुणे विद्यापीठ


दुरध्वनी क्र.०२०–२५६०११८०
२५६०११९०
टेलीग्राफ : 'युनिपुना'
टेलेक्स : १४५ ७७१९ युनीप इन
[illegible]
संकेतस्थळ: www.unipune.ernet.in

गणेशखिंड,पुणे ४११००७



Chandraroop Dakle Jain College of Commerce
Shrirampur


आरक्षण कक्ष
संदर्भ क्र. आरक्षण/ओ २२/७०८
दिनांक – १७/६/२०११

प्रति,
मा.विभाग प्रमुख
सर्व शैक्षणिक विभाग. पुणे विद्यापीठ,पुणे

मा. प्राचार्य/मा. संचालक,
पुणे विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था.

विषय – पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाबाबत.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, शैक्षणिक प्रवेशामध्ये ठेवावयाच्या आरक्षणासंदर्भात शासनाने वेळोवेळी शासन आदेश निर्गमीत केलेले आहेत. प्राप्त शासन आदेश सर्व शैक्षणिक विभाग/सर्व संलग्नित महाविद्यालये/संस्थांना यापूर्वीच वेळोवेळी पाठविण्यात आलेले असून सोबत शासन निर्णयाच्या प्रती जोडत आहे.

तरी शासनाने प्रवेशासंदर्भात वेळोवेळी निर्गमीत केलेल्या शासन आदेशांची काटेकोरपणे अमलबजावणी करावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

सोबत – वरीलप्रमाणे

(signature) १७/६/२०११.
सहा.कुलसचिव
(आरक्षण कक्ष)


Chandraroop Dakle Jain College of Commerce
Shrirampur

# विद्यापीठ -टेबल कामकाज

*विद्यापीठ परिपत्रके, पत्रव्यवहार - विद्यापीठाकडून येणाऱ्या सर्व परिपत्रकांची माहिती घेणे. नवीन सूचना,G.R.,असल्यास चर्चा करावी, तसेच विद्यापीठाने काही माहिती मागविलेली असल्यास ती विद्यापीठास वेळोवेळी पाठविणे.

* सिनिअर महाविद्यालयाच्या प्रवेश प्रक्रियेत वळोवळी विद्यापींठाकडून मार्गदर्शक सूचना येतात त्यानुसार विद्यापीठ नियमांचे पालन करावे.व विद्यापीठाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे प्रमाणे प्रवेश प्रक्रिया राबवावी.

* प्रवेश प्रक्रिया करतांना शासनाने ठरवून दिल्याप्रमाणे प्रवर्गानुसार महाविद्यालयातील प्रवेश क्षमता टक्केवारीनुसार भरण्यात जर काही जागा शिल्लक राहील्यास मागासवर्गीयाच्या जागेवर खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मेरीटनुसार प्रवेश द्यावा.

प्रवर्गानुसार - प्रवेश प्रक्रिया टक्केवारी तक्ता खालीलप्रमाणे आहे.

*उदा.F.Y.B.Com. २ तुकड्या = एकूण

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) अनुसूचित जाती | SC - | १३% | = | ३१ |
| २) अनुसूचित जमाती | ST - | ७% | = | १७ |
| ३) विमुक्त जमाती | NT-A - | ३% | = | ०७ |
| ४) विभक्त जमाती | NT-B - | २ १/२% | = | ०६ |
| ५) भटक्या जमाती | NT-C - | ३ १/२% | = | ०९ |
| ६) भटक्या जमाती | NT-D - | २% | = | ०५ |
| ७) इतर मागासर्व | OBC - | १९% | = | ४६ |
| ८) अपंग सर्व प्रवर्गासह | - | ३% | = | ०७ |
| ९) एस.बी.सी.(विशेष मागासवर्ग) | SBC | २% | = | ०४ |
| १०.खुला प्रवर्ग | OPEN- | ४५% | = | १०८ |
| | | | | 240 |

Note :- खुलाप्रवर्ग = ५०% आरक्षण

Note:- SBC प्रवर्ग विद्यार्थी आरक्षीत जागेमधुन प्रवेश देणे. उपंग विद्यार्थी ज्या त्या प्रवर्गानुसार प्रवेश देणे.

वरील प्रमाणे मुलींसाठी ३३% आरक्षण धरुन आकडेवारी दिलेली आहे. त्यानुसार प्रवेश प्रक्रिया घेणे अपेक्षित आहे. प्रवेश प्रक्रिया प्रवेश समिती मार्फत व्हावी व प्रवेश समितीने मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे. काही अडचणी आल्यास प्राचार्यांशी कार्यालयाशी चर्चा करावी.

* प्रवेश देताना महाविद्यालयात सुरु असलेल्या विषयांसा पुरेशी विद्यार्थी संख्या ठेवावी -विद्यापीठ व शासनाच्या नियमानुसार.



Chandraroop Dakale Jain College of Commerce Shrirampur

दूरध्वनी क्रमांक :
०२०-२५६२ ११८८
२५६२ ११५६
२५६२ ११५७
२५६२ ११९३

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

शैक्षणिक विभाग
(संलग्नता कक्ष)
गणेशखिंड, पुणे - ४११ ००७
टेलिग्राम : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२० - २५६९१२३३
वेबसाईट : www.unipune.ac.in
ई-मेल : affiliation@pun.unipune.ac.in

दिनांक : ०३/०८/२०२२

संदर्भ क्र. : सीए/CA/११८३

प्रति,
मा.प्राचार्य,
रयत शिक्षण संस्था चद्ररुप डाकले जैन कॉलेज ऑफ
कॉमर्स पत्ता: वार्ड न. एक ता.: श्रीरामपूर जि:
अहमदनगर पिनकोड: 413709 (CAAA016090)

**विषय :** शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ साठी कला, वाणिज्य व विज्ञान पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमास मंजूर विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्या १० टक्के अतिरिक्त प्रवेशास मान्यता देणेबाबत.

**संदर्भ :** आपले पत्र क्र.३११/२०२२-२३ दि.२९/७/२०२२

महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भीय पत्रास अनुसरून प्राप्त झालेल्या आदेशानुसार आपल्या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ साठीच **प्रथम वर्ष बी.कॉम. , या पदवी/पदव्युत्तर** अभ्यासक्रमास मूळ विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्या (सर्व जलदगती तुकड्या वगळता) **१० टक्के** अतिरिक्त विद्यार्थी प्रवेशित करण्यास खालील अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

१. शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ मध्ये ज्या अभ्यासक्रमांचे प्रवेश केंद्रीय पद्धतीने होत नाहीत, अशा पारंपरिक अभ्यासक्रमांना १० % अतिरिक्त प्रवेश देण्यात येत आहेत.

२. CBSC/ICSC या केंद्रीय मंडळाच्या विद्यार्थ्यांचा अर्ज प्राप्त झाला असल्यास अतिरिक्त प्रवेश केवळ केंद्रीय मंडळाच्या (CBSC/ICSC) ईयत्ता १२ वी परीक्षेस प्रविष्ट होऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांमधूनच गुणवत्तेनुसार करण्यात यावेत. तसेच केंद्रीय मंडळा व्यतिरिक्त इतर मंडळाची ईयत्ता १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना यापूर्वी जे प्रवेश संबधित महाविद्यालयात देण्यात आलेले आहेत, त्यातील त्या त्या प्रवर्गाचे (cutoff) गुणवत्ता यादीतील सर्वात कमी गुणांवर प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या गुणांपेक्षा कमी गुण असलेल्या विद्यार्थ्यांना या अतिरिक्त जागांवर प्रवेश देऊ नयेत.

३. उपरोक्त अभ्यासक्रमांस मंजूर प्रवेश क्षमतेच्या १०% अतिरिक्त प्रवेश हे गुणवत्ता ,आरक्षण व नियमानुसार देण्यात यावेत.

४. शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ मध्ये गुणवत्ता,आरक्षण व नियमानुसार प्रवेशित केलेल्या विद्यार्थ्यांची यादी (अनुदानित व विनाअनुदानित तुकडीनिहाय अंतिम यादी) शैक्षणिक पात्रता व शैक्षणिक विभागाकडे सादर करावी.

५. अतिरिक्त प्रवेश क्षमता ही केवळ शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ साठी असून वाढीव क्षमतेपोटी कोणत्याही महाविद्यालयांना नवीन तुकडी तसेच नवीन अतिरिक्त पद मंजूर केले जाणार नाही.

६. १०% अतिरिक्त प्रवेशामुळे परिसरातील इतर महाविद्यालयांवर विद्यार्थी प्रवेशाच्या दृष्टीने विपरीत परिणाम झाल्याचे आढळून आल्यास सदर अतिरिक्त प्रवेशाबाबत विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेला निर्णय महाविद्यालयावर बंधनकारक राहील.

७. १०% अतिरिक्त प्रवेश क्षमतेनुसार प्रवेशित झालेल्या जास्तीच्या विद्यार्थ्यांसाठीच्या शैक्षणिक व भौतिक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालय व्यवस्थापनाची राहील.

८. अनुदानित तुकड्यांमधील १०% अतिरिक्त प्रवेशीत विद्यार्थ्यांचे शुल्क अनुदानित तुकड्यांतील विद्यार्थ्यांच्या शुल्काप्रमाणे आकरण्यात यावे.

कळावे,

९. CBSC/ICSC या केंद्रीय मंडळाच्या विद्यार्थ्यांचे त्या त्या प्रवर्गाचे (cutoff) गुणवत्ता यादीतील विद्यार्थी जर १०% पेक्षा जास्त असतील तर त्या महाविद्यालयाने विशेष प्रस्ताव CBSC/ICSC cutoff च्या यादीसह विद्यापीठास स्वतंत्र सादर करावा.

(स. द. डावखर)
उपकुलसचिव

Chandraroop Dakle Jain College of Commerce Shrirampur

ध्वनी क्रमांक :
०२०-२५६२ ११८८
२५६२ ११५६
२५६२ ११५७
२५६२ ११९३

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

शैक्षणिक विभाग
(संलग्नता कक्ष)
गणेशखिंड, पुणे - ४११ ००७
टेलिग्राफी : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२० - २५६९१२३३
वेबसाईट : www.unipune.ac.in
ई-मेल : affiliation@pun.unipune.ac.in

दिनांक : ०३/०८/२०२२

संदर्भ क्र. : सीए/CA/११८२

प्रति,
मा.प्राचार्य,
रयत शिक्षण संस्था चद्ररुप डाकले जैन कॉलेज ऑफ
कॉमर्स पत्ता: वार्ड न. एक ता.: श्रीरामपूर जि:
अहमदनगर पिनकोड: 413709 (CAAA016090)

**विषय :** शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ साठी कला, वाणिज्य व विज्ञान पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमास मंजूर विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्या १० टक्के अतिरिक्त प्रवेशास मान्यता देणेबाबत.

**संदर्भ :** आपले पत्र क्र.३१२/२०२२-२३ दि.२२/७/२०२२

**महोदय,**

उपरोक्त विषय व संदर्भीय पत्रास अनुसरून प्राप्त झालेल्या आदेशानुसार आपल्या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ साठीच **प्रथम वर्ष बी.बी.ए.(कॉम्प्यूटर ॲप्लिकेशन)** , या **पदवी/पदव्युत्तर** अभ्यासक्रमास मूळ विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्या (सर्व जलदगती तुकड्या वगळता) **१० टक्के** अतिरिक्त विद्यार्थी प्रवेशित करण्यास खालील अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

१. शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ मध्ये ज्या अभ्यासक्रमांचे प्रवेश केंद्रीय पद्धतीने होत नाहीत. अशा पारंपरिक अभ्यासक्रमांना १० % अतिरिक्त प्रवेश देण्यात येत आहेत.

२. CBSC/ICSC या केंद्रीय मंडळाच्या विद्यार्थ्यांचा अर्ज प्राप्त झाला असल्यास अतिरिक्त प्रवेश केवळ केंद्रीय मंडळाच्या (CBSC/ICSC) ईयत्ता १२ वी परीक्षेस प्रविष्ट होऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांमधूनच गुणवत्तेनुसार करण्यात यावेत. तसेच केंद्रीय मंडळा व्यतिरिक्त इतर मंडळाची ईयत्ता १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना यापूर्वी जे प्रवेश संबधित महाविद्यालयात देण्यात आलेले आहेत, त्यातील त्या त्या प्रवर्गाचे (cutoff) गुणवत्ता यादीतील सर्वात कमी गुणांवर प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या गुणांपेक्षा कमी गुण असलेल्या विद्यार्थ्यांना या अतिरिक्त जागांवर प्रवेश देऊ नयेत.

३. उपरोक्त अभ्यासक्रमांस मंजूर प्रवेश क्षमतेच्या १०% अतिरिक्त प्रवेश हे गुणवत्ता ,आरक्षण व नियमानुसार देण्यात यावेत.

४. शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ मध्ये गुणवत्ता,आरक्षण व नियमानुसार प्रवेशित केलेल्या विद्यार्थ्यांची यादी (अनुदानित व विनाअनुदानित तुकडीनिहाय अंतिम यादी) शैक्षणिक पात्रता व शैक्षणिक विभागाकडे सादर करावी.

५. अतिरिक्त प्रवेश क्षमता ही केवळ शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ साठी असून वाढीव क्षमतेपोटी कोणत्याही महाविद्यालयांना नवीन तुकडी तसेच नवीन अतिरिक्त पद मंजूर केले जाणार नाही.

६. १०% अतिरिक्त प्रवेशामुळे परिसरातील इतर महाविद्यालयांवर विद्यार्थी प्रवेशाच्या दृष्टीने विपरीत परिणाम झाल्याचे आढळून आल्यास सदर अतिरिक्त प्रवेशाबाबत विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेला निर्णय महाविद्यालयावर बंधनकारक राहील.

७. १०% अतिरिक्त प्रवेश क्षमतेनुसार प्रवेशित झालेल्या जास्तीच्या विद्यार्थ्यांसाठीच्या शैक्षणिक व भौतिक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालय व्यवस्थापनाची राहील.

८. अनुदानित तुकड्यांमधील १०% अतिरिक्त प्रवेशीत विद्यार्थ्यांचे शुल्क अनुदानित तुकड्यांतील विद्यार्थ्यांच्या शुल्काप्रमाणे आकरण्यात यावे.

कळावे,

९. CBSC/ICSC या केंद्रीय मंडळाच्या विद्यार्थ्यांचे त्या त्या प्रवर्गाचे (cutoff) गुणवत्ता यादीतील विद्यार्थी जर १०% पेक्षा जास्त असतील तर त्या महाविद्यालयाने विशेष प्रस्ताव CBSC/ICSC cutoff च्या यादीसह विद्यापीठास स्वतंत्र सादर करावा.

(स. द. डावखर)
उपकुलसचिव

दूरध्वनी क्रमांक :
०२०-२५६२ ११८८
२५६२ ११५६
२५६२ ११५७
२५६२ ११९३

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

शैक्षणिक विभाग
(संलग्नता कक्ष)
गणेशखिंड, पुणे - ४११ ००७
टेलिग्रॅम : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२० - २५६९१२३३
वेबसाईट : www.unipune.ac.in
ई-मेल : affiliation@pun.unipune.ac.in

Chandraroop Dakle Jain College of Commerce Shrirampur

संदर्भ क्र. : सीए/२१३९ दिनांक : १५/११/२०२२

प्रति,
मा.प्राचार्य,
रयत शिक्षण संस्था चद्ररुप डाकले जैन कॉलेज ऑफ
कॉमर्स पत्ता: वार्ड न. एक ता.: श्रीरामपूर जि:
अहमदनगर पिनकोड: 413709 (CAAA016090)

**विषय :** शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ साठी कला, वाणिज्य व विज्ञान पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमास मंजूर विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्या १० टक्के अतिरिक्त प्रवेशास मान्यता देणेबाबत.

**संदर्भ :** आपले पत्र क्र.५२१/२०२२-२३ दि.१२/११/२०२२

**महोदय,** .

उपरोक्त विषय व संदर्भीय पत्रास अनुसरून प्राप्त झालेल्या आदेशानुसार आपल्या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ साठीच **प्रथम वर्ष एम.कॉम.** , या पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमास मूळ विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्या (सर्व जलदगती तुकड्या वगळता) **१० टक्के** अतिरिक्त विद्यार्थी प्रवेशित करण्यास खालील अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

१. शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ मध्ये ज्या अभ्यासक्रमांचे प्रवेश केंद्रीय पद्धतीने होत नाहीत. अशा पारंपरिक अभ्यासक्रमांना १० % अतिरिक्त प्रवेश देण्यात येत आहेत.

२. CBSC/ICSC या केंद्रीय मंडळाच्या विद्यार्थ्यांचा अर्ज प्राप्त झाला असल्यास अतिरिक्त प्रवेश केवळ केंद्रीय मंडळाच्या (CBSC/ICSC) ईयत्ता १२ वी परीक्षेस प्रविष्ट होऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांमधूनच गुणवत्तेनुसार करण्यात यावेत. तसेच केंद्रीय मंडळा व्यतिरिक्त इतर मंडळाची ईयत्ता १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना यापूर्वी जे प्रवेश संबधित महाविद्यालयात देण्यात आलेले आहेत, त्यातील त्या त्या प्रवर्गाचे (cutoff) गुणवत्ता यादीतील सर्वात कमी गुणांवर प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या गुणांपेक्षा कमी गुण असलेल्या विद्यार्थ्यांना या अतिरिक्त जागांवर प्रवेश देऊ नयेत.

३. उपरोक्त अभ्यासक्रमांस मंजूर प्रवेश क्षमतेच्या १०% अतिरिक्त प्रवेश हे गुणवत्ता ,आरक्षण व नियमानुसार देण्यात यावेत.

४. शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ मध्ये गुणवत्ता,आरक्षण व नियमानुसार प्रवेशित केलेल्या विद्यार्थ्यांची यादी (अनुदानित व विनाअनुदानित तुकडीनिहाय अंतिम यादी) शैक्षणिक पात्रता व शैक्षणिक विभागाकडे सादर करावी.

५. अतिरिक्त प्रवेश क्षमता ही केवळ शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ साठी असून वाढीव क्षमतेपोटी कोणत्याही महाविद्यालयांना नवीन तुकडी तसेच नवीन अतिरिक्त पद मंजूर केले जाणार नाही.

६. १०% अतिरिक्त प्रवेशामुळे परिसरातील इतर महाविद्यालयांवर विद्यार्थी प्रवेशाच्या दृष्टीने विपरीत परिणाम झाल्याचे आढळून आल्यास सदर अतिरिक्त प्रवेशाबाबत विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेला निर्णय महाविद्यालयावर बंधनकारक राहील.

७. १०% अतिरिक्त प्रवेश क्षमतेनुसार प्रवेशित झालेल्या जास्तीच्या विद्यार्थ्यांसाठीच्या शैक्षणिक व भौतिक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालय व्यवस्थापनाची राहील.

८. अनुदानित तुकड्यांमधील १०% अतिरिक्त प्रवेशीत विद्यार्थ्यांचे शुल्क अनुदानित तुकड्यांतील विद्यार्थ्यांच्या शुल्काप्रमाणे आकरण्यात यावे.

कळावे,

९. CBSC/ICSC या केंद्रीय मंडळाच्या विद्यार्थ्यांचे त्या त्या प्रवर्गाचे (cutoff) गुणवत्ता यादीतील विद्यार्थी जर १०% पेक्षा जास्त असतील तर त्या महाविद्यालयाने विशेष प्रस्ताव CBSC/ICSC cutoff च्या यादीसह विद्यापीठास स्वतंत्र सादर करावा.

(स. द. डावखर)
उपकुलसचिव